नागपूर शहरातील **सोनेगांव** तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी महानगरपालीकेकडून राबवण्यात येणा-या प्रकल्पातील कामांच्या खर्चास **प्रशासकीय मान्यता देणेबाबत तसेच अनुदान वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**

शासन निर्णय क्रमांक: रासयो-२०१०/प्र.क्र.१७/ता.क. ३

नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: १७ मार्च,२०१०.

वाचा:- नागपूर महानगपरालीकेचे पत्र क्र.NMC/PPC/EE(PPC)/१६१/२००९, दि.९ सप्टेंबर, २००९.

**प्रस्तावना:-**

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य योजनेतंर्गत योजनेत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून सुरू केली आहे. या योजनेतंर्गत सर्वसाधारणपणे खालील मुख्य कामांचा समावेश होतो.

१. तलावाच्या पाण्याचे प्रदुषण करणारे स्त्रोत निश्‍चित करून प्रदुषण रोखण्यासाठी उपाययोजना करणे.
२. तलावात साचलेला अनावश्यक घातक व ऑरगॅनीक गाळ काढणे.
३. तलावाची गुणवत्ता टिकविण्याकरीता, तलावाच्या पाणथळ क्षेत्राची धुप रोखण्यासाठी उपाययोजना करणे
४. तलावातील अनावश्यक व उपद्रवी वनस्पती नष्ट करून त्यांची वाढ नियंत्रणात आणण्यासाठी उपायोजना करणे.
५. तलावांतर्गत जैविक प्रक्रीयेव्दारे तलावातील पाण्याची गुणवत्ता सुधारणे
६. किनारा सौंदर्यीकरण, हरीत पट्टा विकसीत करणे. कुंपण घालणे, मनोरंजनासाठी बालोद्यान, नौकाविहार,कमी किमतीची स्वच्छतागृहे इत्यादी.
७. जनसहभाग व जनजागृतीसाठी कार्यक्रम तसेच प्रदुषण रोखण्यासाठी स्थानिक परीस्थितीनुसार करावयाच्या उपाययोजना.

या योजनेतंर्गत सन २००९-१० या आर्थिक वर्षात नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेमार्फत सादर सोनेगांव तलावाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

राज्य योजनेअंतर्गत योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेत नागपूर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या नागपूर शहरातील सोनेगांव तलावाच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धनासाठी सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सोबत जोडलेल्या **"प्रपत्र - अ"** मध्ये नमूद केलेली कामे पुर्ण करण्यासाठी एकूण **रू. ३,२४,८३,७५८/- (अक्षरी रूपये तीन कोटी चोवीस लाख त्र्याऐंशी हजार सातशे अठ्ठावन्न फक्त)** इतक्या रकमेस सोबत जोडलेल्या **"प्रपत्र -ब"** मधील अटीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे योजनेतील कामे व त्यासाठीचा खर्च याबाबत मासिक आढावा घेऊन त्यानुसार बदल करण्याचे अधिकार शासनाकडे राहतील.सदर मंजुर एकूण रकमेपैकी ७०% हिस्सा म्हणून राज्य शासन व ३०% हिस्सा म्हणून नागपूर महानगरपालिका निधी उपलब्ध करून देईल. सदर योजनेची वित्तीय आकृतीबंध पुढील प्रमाणे राहील:-

| अ.क्र. | हिस्सा | मंजुर निधी | अक्षरी मंजुर निधी |
|---|---|---|---|
| १ | ७०% राज्य हिस्सा | रू.२,२७,३८,६३० /- | रूपये दोन कोटी सत्तावीस लाख अडतीस हजार सहाशे तीस फक्त |
| २ | ३०% नागपूर महानगरपालिकेचा हिस्सा | रू.९७,४५,१२८/- | रूपये सत्याण्णव लाख पंचेचाळीस हजार एकशे अठ्ठावीस फक्त |
| | एकूण | रू.३,२४,८३,७५८ /- | रूपये तीन कोटी चोवीस लाख त्र्याऐंशी हजार सातशे अठ्ठावन्न फक्त |

२. या शासन निर्णयाद्वारे, उपरोक्त मंजूर योजनांच्या अनुषंगाने राज्य हिस्सापोटी देय रू.२,२७,३८,६३०/- पैकी पहिल्या टप्प्यातील कामांकरीता **एकूण रू.६३,००,००० /- (अक्षरी रूपये त्रेसष्ट लक्ष फक्त ) एवढे अनुदान आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना सोनेगांव तलावाच्या कामासाठी मुक्त करण्यात येत** आहे. सदर रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांच्या मार्फत कोषागारातून काढून आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. दे.के.मानकर, अवरसचिव पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. श्या. ना. धकाते, उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना घोषित करण्यात येत आहे. **यासाठी आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर (Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur) यांच्या नावे रू.६३.०० लक्ष एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा.**

३. हा होणारा खर्च मागणी क्र. यू-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण -०४-प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण १०३ वायु व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना. (०२) (०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना - (३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व हा खर्च सन २००९-२००१० या आर्थिक वर्षाच्या उक्त लेखाशिर्षाखालील मुळ मंजूर व पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध एकूण रू.२५०.०० लक्ष अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागच्या सहमतीने त्यांच्या परिपत्रक क्र.अंदाज-१०.०९/सीआर.९०/२००९/अर्थसंकल्प-३ व अनौपचारिक संदर्भ क्र.निरंक, दि.१२ मे, २००९ ला अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक २०१००३१८१७३१४७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(श्या. ना. धकाते)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
जिल्हाधिकारी, नागपूर.
आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

27

शासन निर्णय क्र.रासयो-२०१०/प्र.क्र.१७/ता.क.३, दि.१७ मार्च, २०१० सोबतचे सहपत्र.

प्रपत्र - अ

# CONSERVATION AND BEAUTIFICATION OF SONEGAON LAKE, NAGPUR

| Sr. No. | Item | Description | Amount Rs |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | Core Schemes | | |
| 1.1 | I & D Works | Total station survey of lake and it's surrounding | 1,00,000 |
| | | Visarjan Tank | 17,64,661 |
| | | Tool and Electrification Room | 83,940 |
| | | Toilet Block & Septic Tank | 3,50,015 |
| 1.2 | De-silting | Cleaning, Dredging & Desilting of lake (Subject to detail estimations) | 2,50,00,000 |
| 1.3 | Storm Water Management | Floating Island | 2,91,641 |
| | **Sub Total** | | **2,75,90,257** |
| 2 | **Catchment Area Treatment** | | |
| 2.1 | Afforestation | Green Zone - Tree Plantation | 3,01,450 |
| 2.2 | | Indigenous Tree Plantation along promenade and within the catchment area | 7,30,400 |
| 2.3 | | Fencing | 5,70,234 |
| 2.4 | Check dams | Coursed Rubble Masonary Wall At Overflow | 9,786 |
| 3.0 | **Retaining Structures** | Earthen retaining wall for Retention Pond | 3,64,663 |
| 3.1 | Retaining wall construction / repair | Retaining wall along North Edge | 1,87,405 |
| 3.2 | Shaping/strengthening of bund (including stone pitching/revetment) | Stone Pitching | 12,80,188 |
| | **Sub Total** | | **34,44,126** |
| 4.0 | **Non Core Schemes** | | |
| 5.0 | **Public Awareness & Participation** | Informative Signage's & Lighting | 2,00,000 |
| | **Sub Total** | | **2,00,000** |
| | **Total** | | **3,12,34,383** |
| 7.0 | **Centages (@ 4%)** | | 12,49,375 |
| | **Grand Total** | | **3,24,83,758** |
| Rupees Three Crore Twenty Four Lacs Eighty Three Thousand Seven Hundred Fifty Eight Only | | | |
| | | **70% share of GOM** | 2,27,38,630 |
| | | **30% share of Corporation** | 97,45,128 |

**शासन निर्णय क्र.रासयो-२०१०/प्र.क्र.१७/ता.क.३, दि.१७ मार्च, २०१० सोबतचे सहपत्र.**

**प्रपत्र - ब**

**राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या सोनेगांव तलावाच्या कामांसाठीच्या अटी व शर्ती.**

१. योजनेचा प्रत्येक टप्प्यात हाती घेण्यात येणा-या कामाचे मंजुर तांत्रिक आराखडे, अंदाजपत्रके, नकाशे, संकल्पचित्र ई. शासनाकडे काम सुरू करण्यापूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. शासनास उपरोक्त माहिती सादर केल्यानंतरच कामे सुरू करण्यात यावीत.

२. योजनेतील दुस-या टप्प्यातील कामांसाठी निधीच्या मागणीपत्रासोबत त्याटप्प्यात हाती घेण्यात येणा-या कामांचे मंजुर तांत्रिक आराखडे, अंदाजपत्रके, नकाशे, संकल्पचित्र ई. शासनाकडे सादर करणे बंधनकारक असेल

३. लोकसहभाग व पर्यावरण जनजागृती या कार्यक्रमांविषयी प्रथमतः पर्यावरण विभागास सविस्तर कृती अहवाल सादर करण्यात यावा.

४. तलाव संवर्धन क्षेत्रात तज्ञ व कामाचा अनुभव असलेली तसेच "प्रपत्र-अ" नुसार मजूर खर्चाच्या बाबी संबधीत तज्ञ व पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ असलेली संस्था / शासकीय प्राधिकरण / मंडळ यांची प्रथमतः प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था म्हणून नागपूर महानगरपालिकेने विहीत पध्दतीने नियुक्ती करावी. ही संस्था प्रपत्र-अ नुसार मंजूर खर्चाच्या बाबींचे स्थानिक डी.एस.आर.प्रमाणे खर्चाचे अंदाज, कामाचे आराखडे तयार करणे व तपासणे कामाची गुणवत्ता राखणे, सर्व कामे विहीत कालमर्यादेत पुर्ण करणे याबाबत वेळोवेळी समन्वय करेल. महानगरपालिकेने तांत्रिक मनुष्यबळ प्रकल्पासाठी तयार होण्यासाठी या संस्थेचा उपयोग करावा

५. कामे विहीत कालावधीत पुर्ण करण्याची व कामाची गुणवत्ता राखण्याची संपूर्ण जबाबदारी ही आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांची असेल.

६. प्रकल्पाची यथायोग्य अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून प्रकल्प सनियंत्रण समितीची आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात यावी. या समितीत महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी, कर्मचारी, उपरोक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी यांच्यासह महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा. ही समिती प्रकल्पांतर्गत होत असलेल्या सर्व कामकाजाचे सनियंत्रण करेल व कामांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवेल. सदर समितीची आढावा बैठक दर महिन्याला आयोजित करण्यात यावी.

७. प्रकल्प पूर्ण झाल्यावरही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या मदतीशिवाय तलावाचे संवर्धन होणे गरजेचे असल्याने योजनेची कामे पूर्ण झाल्यावरही ही समिती बैठका आयोजित करेल. ही समिती भौतिक बाबीचो देखभाल, प्रकल्पांपासून मिळाणारे उत्पन्न, प्रकल्प संवर्धनासाठी उपाययोजना व खर्च याबाबत आढावा घेत राहील

८. तलावाच्या पाण्याची गुणवत्ता चालू महिन्यापासून पुढे प्रत्येक महिन्याला तपासण्यात यावी. पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ प्रयोगशाळेची / संस्थेची / मंडळाची नियुक्ती करण्यात यावी. दर महिन्याचा पाण्याच्या गुणवत्तेचा अहवाल सदर संस्था प्रकल्प सनियंत्रण समितीस व पर्यावरण विभागास सादर करेल.

९. उपरोक्त मुद्दयानुसार केलेल्या कार्यवाही प्रमाणे आयुक्त, नागपूर महानगरपालिका हे शासनास दर तीन महिन्याला खालील अहवाल सादर करतील

i ) मंजूर कामांचा भौतिक प्रगती अहवाल

ii) पाण्याच्या गुणवत्ता अहवालाच्या प्रती

iii) प्रकल्प सनियंत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

iv ) खर्चाचे प्रत्येक त्रैमाहिचे उपयोगिता प्रमाणपत्र

१०. सदर अहवाल सादर केल्याशिवाय कामाच्या पुढील टप्प्यातील निधी उपलब्ध करून देण्यात येणार नाही तसेच आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष संपल्यानंतर एप्रिलच्या १० तारखेपर्यंत पर्यावरण विभागास सादर करावे. उपरोक्त मंजुर योजनेसाठी निधी उपलब्धतेनुसार अनुदान मुक्त करण्यात येईल.

११. योजनेतंर्गत मंजूर विशिष्ट कामासाठी अदा केलेली वा मान्य केलेली रक्कम त्याच कामासाठी राज्य शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे व विहीत कालमर्यादेत मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक आहे. हा निधी इतर दुस-या कोणत्याही कामासाठी वा महानगरपालिकेच्या कामासाठी वापरता येणार नाही किंवा वळता करता येणार नाही. विशिष्ट कामासाठी मान्य केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित आयुक्त व महानगरपालिकेची असेल.

१२. या योजनेतंर्गत प्राप्त होणारा निधी हा राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्या अंतर्गत जमा करावा व बँकेत ठेवलेल्या निधीवर मिळणारे व्याज याच निधीत जमा करावे. या निधीच्या उपयोगितेवर नियंत्रण राहण्यासाठी खात्याचे संचालन आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्याद्वारे करण्यात यावे. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतेवेळी बँकेतील या खात्यावर झालेल्या व्यवहाराच्या नोंदी दर्शविणा-या पासबुकाची साक्षांकित प्रत सोबत जोडण्यात यावी.

१३. योजना पूर्ण झाल्यावर या योजनेतंर्गत निर्माण झालेल्या मालमत्तेपासून किंवा सोयीसुविधापासून मिळणारे उत्पन्न हे या योजनेसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यातच जमा करण्यात यावे. या उत्पन्नातून तलाव संवर्धनासाठी अतिरिक्त कामे राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या अनुमतीने हाती घेता येतील. मात्र तलावाच्या संवर्धनाच्या कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी हा महसुली निधी वापरता येणार नाही.

१४. ही कामे शासन आदेशाच्या दिनांकापासुन २४ महीन्यात किंवा तत्पुर्वी पुर्ण करावयाची आहेत.

१५. मंजूर बाबींतील खर्चामध्ये बचत झाल्यास बचत झालेला निधी योजनेतीलच दुस-या उपागासाठी राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या परवानगीने तो वापरता येईल.

१६. राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत निर्माण केलेल्या यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च योजना कार्यान्वयीत झाल्यानंतर संबंधीत महानगरपालिकेने स्वतःच्या निधीतून भागवावयाचा आहे.

१७. योजनेतंर्गत खर्च करण्यात येणा-या रकमेचे लेखे प्रचलित लेखा संहितेनुसारच ठेवण्यात यावेत व त्याचे लेखापरिक्षण स्थानिक निधी व लेखापाल यांच्याद्वारे करण्यात यावे व त्याचा अहवाल पर्यावरण विभागास पाठविण्यात यावा

१८. तलावाच्या कामांच्या प्रगतीच्या अहवालाची तसेच खर्चाच्या विवरणपत्राची पर्यावरण विभागाच्या सक्षम अधिका-याकडून तपासणी करण्यात येईल व तपासणीच्या वेळी महानगरपालिकेने आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल.

१९. संबंधीत महानगरपालिकेच्या हद्दीतील हॉटेलमधून / लॉकवस्तीतून / वाणिज्यक आस्थापनेतून निघणारे सांडपाणी तलावात जाणार नाही याची जबाबदारी संबंधीत महानगरपालिकेवर असेल.

२०. योजनेवरील कामासाठी मान्यता प्राप्त झालेल्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च झालेली रक्कम शासनाकडून उपलब्ध होणार नाही. या कामासाठी शासनाने अदा केलेली रक्कम जर त्या कामावर घालून दिलेल्या विविक्षित वेळेमध्ये खर्च होऊ शकल नसेल तर त्यास राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल..

२१. योजनेवरील कामासाठी अदा केलेली रक्कम योग्यरितीने वापरली जात नाही किंवा कामाची योग्य ती प्रगती होत नाही असे शासनाच्या निदर्शनास आल्यास शासन कोणत्याही क्षणी अशा कामांची प्रशासकीय मान्यता रद्दबातल करु शकेल.

२२. राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या परवानगी शिवाय तलावात बोटींगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तसेच यांत्रिक बोटींचा वापर तलावात कुठल्याही प्रयोजनासाठी अनुज्ञेय असणार नाही. फक्त पॅडल बोटचा वापर अनुज्ञेय असेल.

२३. तलावात मत्स्यमारी शक्यतो करण्यात येवू नये. मत्स्यमारी करावयाची झाल्यास फक्त मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यासाठी परवानगी देण्यात यावी. अशावेळी १० इंच व त्यापेक्षा लहान आकाराच्या माशांना पकडण्याची मुभा देण्यात येवू नये. स्थानिक परिस्थितीनुसार याबाबत प्रकल्प संनियंत्रण समिती वेळोवेळी निर्णय घेईल.

२४. योजनेवरील कामांसाठी राज्य शासनाच्या अनुदाना व्यतिरीक्त शासनाकडून, वित्तीय संस्थाकडून वा आणखी कोणत्याही संस्थाकडून प्राप्त निधी या योजने अंतर्गत खर्च झाल्याचे दर्शविण्यात येवू नये. (No Overlaping of schems)

२५. योजनेचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्यासाठी भेट देणा-या राज्य शासनाच्या अधिका-यांस आवश्यक त्या सर्व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असेल.

२६. योजनेतंर्गत शासनाच्या अनुदानातून तयार केलेली मालमत्ता, ज्या कामासाठी निर्माण केली आहे त्याच कामासाठी वापरणे आवश्यक आहे व त्यासाठी ही मालमत्ता अभिलेखित करणे आवश्यक आहे.

२७. योजनेतंर्गत करण्यात येणा-या निरनिराळया कामांचे व समन्वयाचे काम राज्य स्तरावरील सनियंत्रण समितीव्दारे करण्यात येते. या समितीने कामाबाबत वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

२८. योजनेतंर्गत महानगरपालिकेच्या होणा-या आस्थापनेवरील व लागणा-या मनुष्यबळावरील खर्च संबंधीत महानगरपालिकेद्वारे करण्यात येईल. यासाठी या विभागाकडून अनुदान देण्यात येणार नाही.

२९. योजनेतंर्गत तलावातून काढण्यात येणा-या गाळाचे अभिलेख व छायाचित्रासह पुरावे महानगरपालिकेने जतन करावेत. तसेच गाळाच्या विल्हेवाटीची अभिलेखामध्ये नोंद करून ठेवावी.

३०. राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटींचे व शर्तीचे पालन करणे महानगरपालिकेवर बंधनकारक राहील.

३१. योजनेतंर्गत किती लोकांना रोजगार उपलब्ध झाला याची नोंद ठेवावी.

३२. योजना कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक असल्याने योजने करीता कोणतही एस्कलेशन चार्जेस अनुज्ञेय नाहीत.

३३. योजनेतंर्गत मंजूर कामांच्या निविदा हया प्रकल्पातंर्गत मंजूर किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या स्विकारण्यात येऊ नयेत.

३४. कॉन्ट्रक्टरने विहीत वेळेत काम पुर्ण न केल्यास त्यांच्यावर दंडाची तरतूद ठेवण्यात यावी.

३५. योजनेतंर्गत झालेल्या सर्व खर्चाचा ताळमेळ वेळोवेळी अधिदान व लेखाअधिकारी कार्यालय, मुंबई व तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयाशी घालण्याची जबाबदारी संबधीत महानगरपालिकेची असेल.

३६. योजना पूर्ण झाल्यावर भविष्यात तलावाच्या उपयोगाबाबत व वापराबाबत किंवा तलावासंदर्भात कोणतीही नविन कामे हाती घ्यावयाची झाल्यास त्यास प्रथम राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची मान्यता घेण्यात यावी.

नागपूर शहरातील **सोनेगांव** तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी महानगरपालीकेकडून राबवण्यात येणा-या प्रकल्पातील कामांच्या खर्चास **प्रशासकीय मान्यता देणेबाबत** तसेच **अनुदान वितरीत करण्याबाबत** ३)

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**
शुध्दीपत्रक क्रमांक: रासयो-२०१०/प्र.क्र.१७/ता.क. ३
नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ३० मार्च,२०१०.

**पहावे :** या विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दि.१७ मार्च, २०१०

**प्रस्तावना :**

राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत सन २००९-१० या आर्थिक वर्षात एकुण रू.२५०.०० लाख एवढी तरतुद मंजुर व अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. सदर मंजुर तरतुद सुधारित अंदाजामध्ये रू.२००.०० लाख एवढी मंजुर झाल्याने सदर कार्यक्रमाखाली सोनेगांव तलावाच्या संवर्धनासाठी संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यास मान्यता दिलेला निधीत सुधारणा करणे आवश्यक आहे,

**शुध्दीपत्रक :**

उपरोक्त प्रस्तावनाचा अनुषंगाने संदर्भाधीन दि.१७ मार्च, २०१० चा शासन निर्णयातील परिच्छेद दोन खाली दुस-या ओळीत एकूण रू.६३,००,०००/- (अक्षरी रूपये त्रेसष्ट लक्ष फक्त) ऐवजी **एकुण रू.१३,००,०००/- (अक्षरी तेरा लक्ष फक्त )** असा वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(श्या. ना. धकाते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
जिल्हाधिकारी, नागपूर.
आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी. मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प -७, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.

नागपूर शहरातील **सोनेगांव तलावाच्या** पर्यावरण संवर्धनासाठी महानगरपालिकेकडून राबवण्यात येणा-या प्रकल्पातील कामांच्या खर्चास **प्रशासकीय मान्यता देणेबाबत तसेच अनुदान वितरीत करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**
शासन निर्णय क्रमांक: रासयो-२०१०/प्र.क्र.१७/ता.क. ३
नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २८ एप्रिल,२०१०.

वाचा:-या विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दि.१७ मार्च, २०१० व समक्रमांकाचा शुध्दीपत्रक दि.३० मार्च, २०१०.

**प्रस्तावना:-**

राज्यातील तलाव/सरोवर व मोठे जलाशय यांच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धनासाठी सरोवर संवर्धन योजना सन २००६-२००७ या वर्षापासून राज्यात सुरु करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने नागपूर येथील सोनेगांव तलावाच्या पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व सौंदर्यीकरण कामाच्या एकूण रुपये ३२४.८४ लाख एवढ्या रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ७० टक्के हिस्सा रुपये २२७.३९ लाख एवढी रक्कम राज्य शासनाकडून तसेच ३० टक्के हिस्सा म्हणून रुपये ९७.४५ लाख इतकी रक्कम मंजूर आहे. राज्य हिस्स्यापैकी रू.१३.०० लाख एवढी रक्कम नगर परिषदेस संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे मुक्त करण्यात आली आहे.

सन २००९-१० या आर्थिक वर्षात उपरोक्त कार्यक्रमांसाठी ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण या मुख्य लेखाशिर्षाखाली एकूण रुपये ५००.०० लाखाची तरतूद मंजूर आहे. त्यापैकी निधी मुक्त करावयाचा शासन विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

राज्य योजनांतर्गत योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेनर्गत नागपूर शहरातील सोनेगाव तलावाच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी यापूर्वी मंजूर एकूण रु.३२४.८४ लाखांपैकी अनुज्ञेय राज्य हिस्स्याचे ७० टक्के म्हणजेच रुपये २२७.३९ लाखापैकी रुपये १३.०० लाख निधी संदर्भाधीन शासननिर्णयान्वये मुक्त करण्यात आला असून, आता **या शासन निर्णयाद्वारे रुपये ५०.०० लाख (अक्षरी रूपये पन्नास लाख फक्त)** आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना वितरीत करण्यास संदर्भाधीन दिनांक १७ मार्च.२०१० च्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

२. **यासाठी आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर, (Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur) यांचे नावे रुपये ५०.०० लाख (अक्षरी रूपये पन्नास लक्ष फक्त) एवढ्या निधीचा धनादेश काढण्यात यावा.**

३. सदर होणारा खर्च मागणी क्र. यू-४,३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण-०४-प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण (१०३) वायु व जल प्रदुषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना. (०२)(०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना-(३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१०-११ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अदान २०.१०/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प-३ दिनांक ०३.४.२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय शासनाच्या सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००५१०२०२०३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(द.के.मानकर)
**अवर सचिव,,महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
जिल्हाधिकारी, नागपूर.
आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प -७, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.